श्री भाऊसाहेब शिवाजी राऊत, परिचर, प्रा.आ.केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा, हे कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत..

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र. साप्रवि-१/आस्था-४/०८/४७४/२०२६
अहिल्यानगर दिनांक — स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे

वाचा :- १. इकडील ज्ञापन/दोषारोपपत्र जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/०८/४९०/२०२५, दिनांक ०९/१०/२०२५

२. श्री. राऊत, परिचर यांचेकडील दि. २७/१०/२०२५ रोजीचा लेखी खुलासा

३. इकडील कार्यालयीन आदेश जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/०८/५९१/२०२५, दिनांक २८/११/२०२५

४. सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांचेकडील चौकशी अहवाल जा.क्र. विशा.४/खाचौ/सी.आर. १५२/२०२५ दिनाक ०८/०५/२०२६

५. इकडील कार्यालयीन आदेश जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/०८/४३९/२०२६, दिनांक २३/०७/२०२६

६. गटविकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था-१/१३३२/२०२६, दिनांक १८/०८/२०२६

७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (चार)

श्री भाऊसाहेब शिवाजी राऊत, परिचर हे प्राथमिक आरोग्य केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा येथे कार्यरत असताना दिनांक ०७/०१/२०२५ ते दिनांक २५/०९/२०२५ पर्यंत एकूण २६१ दिवस कार्यालयास कोणतीही पुर्वकल्पना न देता कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर राहिलेने संदर्भ क्र. ०१ नुसार दोषारोप पत्र बजावण्यात येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आले होते. संदर्भ क्र. ०२ नुसार श्री भाऊसाहेब शिवाजी राऊत, परिचर यांनी खुलासा सादर करुन दोषारोप अमान्य केलेने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने संदर्भ क्र. ०३ नुसार नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली होती. संदर्भ क्र. ०४ नुसार विभागीय चौकशी अहवालामध्ये तुमच्यावर ठेवणेत आलेले एक आरोप सिध्द व दूसरा अंशतः सिद्ध होत असल्याचे निष्कर्ष नमुद केलेला आहे. संदर्भ क्र. ०५ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९६४ मधील नियम ४ (६) नुसार सेवेतून काढून टाकणे ही शिक्षा का करणेत येवू नये? याबाबत खुलासा सादर करणेकरिता कळविण्यात आलेले आहे.

श्री भाऊसाहेब शिवाजी राऊत, परिचर यांनी संदर्भ क्र. ०६ नुसार सादर केलेला लेखी खुलासा हा अंशतः मान्य करण्यात येत आहे. संदर्भ क्र. ०५ अन्वयेचे अंतिम कारणे दाखवा नोटिसीत नमूद केलेल्या शिक्षेऐवजी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (चार) नुसार, पुढील चार वर्षे समयश्रेणीतील निम्न स्तरावर आणणे व सदर कालावधीत वेतन वाढी देण्यात येवू नये. ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री भाऊसाहेब शिवाजी राऊत, परिचर, प्रा.आ.केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202609250401 64- असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 25-09-2026 14:34:34
आनंद भंडारी, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री भाऊसाहेब शिवाजी राऊत, परिचर, प्रा.आ.केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा
व्दारा व प्रत - वैद्यकिय अधिकारी, प्रा प्रा.आ.केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा

२ -/ श्री भाऊसाहेब शिवाजी राऊत, परिचर, प्रा.आ.केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत - १. गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा
२. निवड नस्ती